# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे महिला दिनानिमित्त हुकूमाची राणी कार्यक्रम उत्साहात संपन्न

**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :**
डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त हुकूमाची राणी या विशेष कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्यातील विविध कौशल्यांना वाव देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून लेखिका सौ. सुचेता पाटील व जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, मुंबई यांच्या समाजसेविका सौ. स्नेहल कुलकर्णी या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत आय. क्यू.ए. सी. विभाग प्रमुख डॉ. प्रियांका गायकवाड आणि डिप्लोमा




विभाग प्रमुख प्रा. सौ. एस. व्ही. मगदूम यांच्या हस्ते सन्मानपूर्वक करण्यात आले

कार्यक्रमात लेखिका सौ. सुचेता पाटील यांनी आपल्या लेखन प्रवासातील अनुभव सांगताना प्रेरणादायी बोधकथा मांडल्या. तसेच सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणासाठी केलेला संघर्ष व घेतलेले कष्ट यांचा उल्लेख करत उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तर सौ. स्नेहल कुलकर्णी यांनी महिला सक्षमीकरणाचे महत्त्व स्पष्ट करून महिलांनी आत्मविश्वास, शिक्षण व कर्तृत्वाच्या जोरावर समाजात आपले स्थान निर्माण करावे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमामध्ये महिलांसाठी विविध मनोरंजक व ज्ञानवर्धक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित महिला पालकवर्ग यांनी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, एकात्मता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या सौ. वंदना पाटील यांना पैठणी साडी हे आकर्षक बक्षीस प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम, कार्यकारी संचालक डॉ. सुनिल आडमुठे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. दर्शनी तराळ, प्रा. पूजा खोत, प्रा. मयुरी पाटील तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी कु. श्रेया मगदूम यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, महिला पालकवर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला.